Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

23

# आजच्या मराठी विनोद वीरांगना

**सौ. वर्षा संतोष कर्वे**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट**

**प्राचार्य डॉ. रामाकिशन दहिफळे**
**मार्गदर्शक**

---

मराठी चित्रपटसृष्टी म्हटलं की अनेक नावाजलेले चेहरे डोळ्यासमोर येतात. त्यातही मराठी विनोदी अभिनय म्हटलं की अनेक अभिनेते डोळ्यासमोर येतात. परंतु विनोदी अभिनेत्री म्हटलं तर जरा विचार करावा लागतो. मुळातच विनोदनिर्मिती करणे हे सोपे नाही त्यात स्त्री ने करणे तर नाहीच नाही. तरीदेखील आजवर मराठी चित्रपट नाट्य क्षेत्रात अनेक सशक्त विनोदी अभिनेत्री होऊन गेल्या. पण आजच्या काळातल्या विनोदी अभिनेत्री, विनोदकडे आणि एकूणच या क्षेत्राकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन या कुतूहलापोटी काही जाणींशी प्रत्यक्ष संपर्क साधून मुलाखती घेतल्या आणि त्याच या लेखात संक्षिप्त स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**अतिशा नाईक:**

अतिशा नाईक या मराठी चित्रपट, मालिका आणि नाट्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण अभिनेत्री आहेत. छोट्या पडद्यावरील अनेक मालिकांमधून त्यांनी आपल्या अभिनयामुळे एक मोठा प्रेक्षकवर्ग निर्माण केला आहे. त्यांचाशी प्रत्यक्ष बोलताना त्यांचातील सक्षम अभिनेत्रीची ओळख झाली. मी मुलाखत घेताना त्यांनी सर्व प्रश्नांची आदरपूर्वक उत्तरे दिली. त्यांनी बालकलाकार म्हणून 'गुड बाय डॉक्टर' या नाटकातून रंगभूमीवर तर महेश मांजरेकरांच्या 'प्राण जाएं पर वचन ना जाएं' या हिंदी चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. अतिशाताईंनी अनेक गाजलेल्या नाटकांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. वाडा चिरेबंदी, गिधाडे, सूर्याची पिल्ले, अशी ही श्यामची आई, जाऊबाई जोरात ही त्यांची गाजलेली नाटके आहेत.

पण खऱ्या अर्थाने त्यांनी घराघरातल्या प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले ते मालिकांमधूनच! आभाळमाया (झी मराठी), घाडगे & सून (कलर्स मराठी), स्वप्नांच्या पलीकडले (स्टार प्रवाह) या त्यांच्या काही गाजलेल्या मालिका. आपल्या अभिनयाच्या जोरावर त्यांनी हिंदी मालिका विश्वातही पदार्पण केले. तारक मेहता का उलटा चष्मा, एक पॅकेट उम्मीद अश्या मालिकांमधून त्यांनी अभिनय केला आहे.

अतिशाताईंची प्रत्यक्ष मुलाखत घेताना मला त्यांच्याविषयी अनेक गोष्टी कळाल्या. संजय मोने दिग्दर्शित 'सॉरी रॉंग नंबर' या नाटकामुळे आपल्याकडे विनोदी शैली आहे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. "चित्रपट क्षेत्रामध्ये सक्षमपणे उभे राहायचे असल्यास आपल्याला स्वतःवर विश्वास पाहिजे. आपल्याकडे पाय मागे खेचले जातातच, ती अनेकांची वृत्ती असते. त्यातूनही स्वतः वर विश्वास ठेऊन गंभीर व खंबीर पणे उभे राहणे महत्वाचे आहे", असे त्या म्हणतात. या क्षेत्रात पदार्पण करताना त्यांना आपल्या आईचा पाठिंबा खूप महत्त्वाचा होता. आणि आतिशाताईंच्या आईही त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या होत्या. त्यांनी सांगितलेला एक प्रसंग मनाला खूपच चटका लावून गेला. 'सॉरी रॉंग नंबर' या नाटकाच्या वेळी त्यांना श्वास घ्यायला त्रास होत होता. दादरला शिवाजी मंदिर नाट्यगृहात दुपारी त्यांचा प्रयोग होता पण खूप ताप असल्याने त्यांना उभेही राहवत नव्हते. पण संजय मोने, शुभांगी गोखले, चेतन दळवी अश्या सहकलाकारांनी त्यांना सांभाळून घेतले आणि त्यांनी त्या अवस्थेतही प्रयोग पूर्ण केला. स्वतःला सांभाळत, स्वतःला जपत पुढे जायचं असतं असा मोलाचा संदेश त्यांनी नवीन पिढीला दिला आहे. विनोदी शैली साकारताना आपल्या वाट्याला आलेले दुःख प्रेक्षकांसमोर न दाखवता आपले काम पूर्ण करणे यासाठी मोठे धाडस लागते असे त्या म्हणतात. चित्रपट नाट्य क्षेत्रात कोणतीही गोष्ट माणूस एकटा करू शकत नाही त्यासाठी टीमवर्क महत्वाचे असते यावर त्यांचा ठाम विश्वास आहे.

विनोदनिर्मितीचा संस्कार होण्यासाठी डोळे आणि कान सतत उघडे ठेवणे महत्वाचे आहे. चार्ली चॅपलिन, लॉरेल एंड हार्डी, जॉनी लिव्हर, दामूआण्णा मालवणकर यांचे सिनेमे त्यांनी पाहिले व त्यांचा अभ्यास केला. कारण प्रत्येकाच्या विनोदाची शैली वेगळी असते पण लोकांना हसवणे हाच प्रत्येक विनोदी कलाकाराचा उद्देश असतो असे त्या म्हणतात.

अशाप्रकारे विनोदी शैलीतून प्रेक्षकांच्या मनात आपले स्थान निर्माण करणारी एक शिस्तबद्ध आणि ध्येयवादी अभिनेत्री म्हणून अतिशा नाईक यांची ओळख आहे. कलाक्षेत्रात खूप अनुभव असूनही त्यांनी कोणत्याही प्रकारे 'मी' ला केंद्रस्थानी ठेऊन मुलाखत दिली नाही, तर अजूनही मी शिकतेच आहे अशी त्यांची विचारसरणी आहे. अश्या या चतुरस्त्र अभिनेत्रीला कलाक्षेत्रातील पुढील प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा!

**सुहास परांजपे:**

मराठी मालिका क्षेत्रातील आणखी एक ओळखीचा व कायमच आपल्या कुटुंबातील एक वाटणारा चेहरा म्हणजे सुहास परांजपे यांचा! जवळपास गेली ३ दशकं सुहास ताई मराठी मनोरंजन क्षेत्रात कार्यरत आहेत. या लेखाचा विषय जरी मराठी विनोदी अभिनेत्री असा असला

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

तरीसुद्धा सुहासताईंना फक्त विनोदी अभिनेत्री या साच्यात बसवणे म्हणजे त्यांच्या अष्टपैलू अभिनय शैलीवर अन्याय केल्यासारखे होईल. नायिका, खलनायिका, सहायक भूमिका, विनोदी भूमिका अश्या अनेक रूपांमधून आजवर त्या आपल्या समोर आल्या आहेत.

परंतु आपल्या विनोदी शैलीविषयी बोलताना त्या कामाचे श्रेय जराही स्वतः घेत नाहीत. मुळात त्या विनोदी व्यक्तिरेखा साकारू शकतात याची प्रचिती त्यांना दिग्दर्शक देवेंद्र पेम यांच्यामुळे आली. २००१ साली सुहास ताईंनी एका स्पर्धेसाठी 'Turning Point' नावाची एकांकिका केली होती. त्याचे दिग्दर्शक होते देवेंद्र पेम. या एकांकिकेच्या अगोदर सुहासताईंनी सगळ्या गंभीर भूमिका केल्या होत्या पण देवेंद्रजींना असं वाटलं की विनोदी भूमेकितही सुहास ताई 'फिट्ट' बसतील, म्हणून तो प्रयोग करायचं ठरलं आणि चक्क एकांकिका 'हिट्ट' झाली. याच एकांकिकेचं पुढे व्यावसायिक नाटक झालं ते म्हणजे 'तुमचा मुलगा करतो काय?'. या नाटकानंतर सुहासताईंनी कधीही मागे वळून पाहिलं नाही! मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेल्या 'ऑल दि बेस्ट' या नाटकाचा महत्त्वाचा भाग असल्याचा सुहास ताईंना अभिमान आहे. बॅरिस्टर या नाटकामधील राधक्का च्या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री चा पुरस्कार प्राप्त झाला आहे तसेच सध्या रंगभूमीवर पुनर्जीवित झालेल्या 'सूर्याची पिल्ले' या नाटकामध्ये सुहास ताई महत्वाची भूमिका बजावत आहेत.

मराठी रंगभूमीच्या खाणीतून रत्न निघतात आणि ती पुढे चित्रपट मालिका क्षेत्रात चमकतात हा आजवरचा इतिहास आहे! त्याचप्रमाणे सुहासताईंनी नाटकाबरोबरच

'पहिले मी तुला', 'सुपरस्टार', 'मोहन आवटे', 'कोण आहे रे तिकडे', अश्या चित्रपटांमधून तर 'नंदा सौख्य भरे', 'कॉमेडी एक्सप्रेस','दार उघड बये', 'हसण्यावारी घेऊ नका', 'सहकुटुंब सहपरिवार', 'आनंदी हे जग सारे', 'आबंट गोड', 'सारे तुझ्याचसाठी', 'अनुबंध', यांसारख्या मालिकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. टीव्हीच्या पडद्यावर दिसणाऱ्या एखाद्या कलाकाराच्या हसऱ्या चेहऱ्यामागे कित्येकदा भयानक दुःखाचे वास्तव असते याची कल्पनाही प्रेक्षक करू शकत नाहीत. २००९ सुहास ताईंच्या आयुष्यात असाच एक अत्यंत कठीण प्रसंग आला. त्यांची सख्खी मोठी बहीण 'लिना' हिचे दुर्दैवी निधन झाले, आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी अनुबंध मालिकेचं चित्रीकरण असणार होतं. इतक्या दुःखात असतानाही सुहासताई कामाप्रती असलेली निष्ठा जपत सकाळी मालिकेच्या सेटवर हजर झाल्या. आणि त्याहूनही मोठी बाब म्हणजे आदल्या रात्री बहीण देवाघरी गेली असताना दुसऱ्या दिवशी त्यांनी हसऱ्या चेहऱ्याने मुलाच्या बारश्याचा प्रसंग मालिकेत सादर केला. खरचं, हे सर्व एक खरा कलावंतच करू जाणे!

आपली आजवरची कारकीर्द ही आपल्या कुटुंबामुळे शक्य झाली असे सुहास ताई म्हणतात. चांगल्या वाईट काळात त्यांना कुटुंबाची कायमच साथ लाभली. तसेच रंगभूमीवर नटराजाचा आणि शूटिंग करताना कॅमेराचा एक जादुई आशीर्वाद आपल्याला मिळतो असा त्यांना विश्वास आहे म्हणूनच व्यक्तिगत जीवनात कितीही कठीण प्रसंग आला, कितीही शारीरिक तक्रारी असल्या तरी स्टेजवर किवा कॅमेरासमोर गेल्यानंतर आपोआप सगळं विसरून फक्त अभिनय करता येतो असा त्यांचा अनुभव आहे.

पुढची अनेक वर्षे वेगवेगळ्या माध्यमांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याची शक्ती रंगदेवात सुहास ताईंना देवो! त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा!

**स्नेहल शिदम:**

आजकाल धकाधकीच्या जीवनात सर्वजण कुठेतरी शांतता, हास्य शोधण्याचा प्रयत्न करत असतात. छोट्या पडद्यावरील काही हास्यप्रधान कार्यक्रम यामध्ये मोलाची भर घालतात. अश्या रियलिटी शो मधून अभिनय करणारे अनेक कलाकार रोज घरबसल्या आपल्या भेटीला येतात व आपल्याच घरातले वाटू लागतात.

झी मराठी वरील 'चला हवा येऊ द्या' हा कार्यक्रम सर्वांच्या आवडीचा व खळखळून हसवणारा कार्यक्रम होता. यातील सर्वच कलाकार मंडळी एका पेक्षा एक हास्यसम्राट होती. त्यातीलच एक स्त्री कलाकार म्हणजे स्नेहल शिदम. चला हवा येऊ द्या मधून त्यांनी नुसतेच प्रेक्षकांना हसवले नाही तर आपला एक वेगळा प्रेक्षकवर्ग तयार केला.

स्नेहल यांची मुलाखत घेताना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खूप काही कळालं. स्नेहल साडेतीन वर्ष्यांच्या होत्या तेव्हा त्यांनी नृत्य स्पर्धेमध्ये पाहिलं बक्षीस पटकावलं. मुंबईतील त्यांच्या घरासमोर सब-वे चे काम पूर्ण झाले होते. त्याच्या लोकार्पणाच्या कार्यक्रमाच्या वेळी त्यांना बक्षीस मिळाले व त्यांचे खूप कौतुक झाले.

स्नेहल यांचे बालपण चाळीमध्ये गेले. तिथे त्यांनी विविध प्रकारची माणसं पाहिली आणि त्यांचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातूनच त्यांना अनेक पात्रे सापडली. कधीकधी निरीक्षण करून काही माणसांप्रमाणे गमतीशीर बोलण्याचा त्या प्रयत्न करून बघायच्या, त्यातूनच त्यांच्या विनोद बुद्धीने जन्म घेतला असे त्या म्हणतात.

जेव्हा त्यांनी शाळा-कॉलेजातून अभिनयाला सुरुवात केली तेव्हा त्यांच्या घरच्यांनी त्यांना पाठिंबा दिला आणि जसजश्या त्या टीव्ही वर दिसू लागल्या तशी घरच्यांकडून कायमच शाबासकीची थाप मिळत गेली. परिवाराच्या अनेक जबाबदाऱ्या स्नेहल ताईंनी निभावल्या आणि आपल्या कामाप्रती असलेली प्रत्येक जबाबदारीही त्यांनी पार पाडली. या बद्दल सांगताना त्यांना गहिवरून आलं. त्या म्हणाल्या की, एका

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

नाटकाच्या प्रयोगाच्या आधी त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला. डॉक्टरांनी आरामाची सक्त ताकीद दिली होती पण प्रयोगाची तारीख वेळ ठरली होती. तिकीटही विकली गेली होती. त्यामुळे प्रयोग रद्द करणे शक्य नव्हते. पायाच्या वेदना सहन करून त्यांनी प्रयोग पार पाडला. पण त्यांचं खरं कौतुक तेव्हा वाटलं जेव्हा त्या म्हणाल्या, की "तो प्रयोग मी फक्त नाटक पार पाडण्यासाठी केला नाही. तर एका नाटकाच्या प्रयोगावर अनेक लोकांचं घर

चालतं, तो एक प्रयोग न केल्याने कदाचित मला काही फरक पडला नसता पण ज्यांचं हातावरचं पोट आहे अश्या बैकस्टेज कलाकारांना आणि जे वेळ आणि पैसे खर्च करून नाटकाला येणार होते त्या प्रेक्षकांना मात्र खूप फरक पडला असता." खरचं त्यांचे विचार थोर आहेत.

स्नेहलताईंशी मनमोकळ्या गप्पा मारल्यावर हे लक्षात आलं की त्या मनोरंजन क्षेत्रात आपल्या अभिनयाचा ठसा उमटवू पाहणाऱ्या एक सक्षम कलाकार तर आहेतच पण त्याच बरोबर अतिशय कष्टाळू, नम्र, व टिमवर्क वर विश्वास ठेवणाऱ्या अभिनेत्री आहेत.

स्नेहलताईंना त्यांच्या या क्षेत्रातील पुढील कारकिर्दीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा!

**नेहा शितोळे:**

काही मराठी अभिनेत्री आपल्याला वारंवार अनेक भूमिकांमधून दिसतात पण काही अभिनेत्री जाणीवपूर्वक अश्याच भूमिका स्वीकारतात ज्या दीर्घकाळ प्रेक्षकांच्या मनात घर करून राहतील, आपल्या कामांच्या संख्येला त्या दुय्यम स्थान देतात. अशीच एक चतुरस्त्र आणि खूप विचार करून कामाचा स्वीकार करणारी अभिनेत्री म्हणजे नेहा शितोळे! २०११ साली गिरीश कुलकर्णी व उमेश कुलकर्णी यांच्या देऊळ चित्रपटात काम करण्याची संधी नेहा यांना मिळाली. चित्रपट चांगलाच गाजला आणि नेहा यांचं कामही उत्तम झालं होतं, त्याचाच परिणाम असा झाला की नेहा यांना झी मराठी कडून त्यांच्या आगामी 'फू बाई फू' या विनोदी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी विचारणा झाली. नेहाताईंनी होकार दिला आणि मग एक सशक्त अभिनेत्री म्हणून संपूर्ण महाराष्ट्र त्यांना ओळखू लागला.

आजवरच्या कारकिर्दीत त्यांनी तू तिथे मी, कुंकू, झुंज मराठमोळी, का रे दुरावा' यांसारख्या मालिका, तर 'कमिने, पोपट, पोश्टर गर्ल, सूर सपाटा, वेल डन बेबी, एक व्हिलन रिटर्न' यांसारख्या चित्रपटांतून महत्त्वाच्या भूमिका केल्या आहेत. नेटफ्लिक्स वर प्रदर्शित झालेल्या सेक्रेड गेम्स या जगभर गाजलेल्या वेब सिरीज मध्येही त्यांचा वखाणण्याजोग अभिनय पाहायला मिळतो. सध्या त्या कलर्स मराठी वरील अशोक मा. मा. या मालिकेत महाराष्ट्रभूषण पद्मश्री अशोक सराफ यांच्याबरोबर काम करत आहेत. इतक्या महान अभिनेत्याबरोबर काम करताना दडपण जाणवते का? असं विचारल्यावर त्या "अजिबात नाही!" असं म्हणाल्या. म्हणूनच अशोक सराफ इतके मोठे नट आहेत, प्रत्येक कलाकाराला आपलस करून ते काम करतात. एक एक बारकाई बघतात, चुकलं तर अनेक वेळा सराव करतात…आजही! या सगळ्या गोष्टी शिकायला मिळणं यासाठी भाग्य असावं लागतं!

याही मालिकेमध्ये नेहा ताईंची विनोदी भूमिकाच आहे. परंतु तरीही, आपल्याला विनोद करता येत नाही असं त्यांना वाटतं.. आपल्याकडे विनोदाचं टाइमिंग नाही, आपण फक्त उभे राहून विनोदनिर्मिती करू शकत नाही असं त्यांचा मत आहे. म्हणूनच त्यांनी फू बाई फू नंतर तसा विनोदी कार्यक्रम पुन्हा केला नाही. पण तरीही त्यांनी मालिका आणि चित्रपटांमध्ये अनेक विनोदी भूमिका केल्या आहेतच की आणि त्या प्रेक्षकांना आवडल्या देखील आहेत. त्या सगळ्याचं श्रेय नेहा ताई ते पात्र लिहिणाऱ्या लेखकांना आणि दिग्दर्शकांना देतात. ते पत्र एखाद्या परिस्थितीत विशिष्ट प्रकारे वागतं म्हणून विनोदनिर्मिती होते आणि म्हणून हसू येतं असं त्यांचं मत आहे.

अभिनयाचा प्रवास उत्तम चालू असतानाच २०१९ मध्ये त्यांनी एक आव्हान स्वीकारलं ते म्हणजे Big Boss या स्पर्धेत सहभागी होण्याचं. आपण १०० दिवस टिकून राहू का याबद्दल त्यांना शंका होती पण त्यांनी चक्क १०० दिवसांचा प्रवास पूर्ण करत दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी पटकावली. १०० दिवसांनी big boss च्या घराबाहेर आल्यानंतर आपल्या पतीच्या आणि कुटुंबियांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहून त्यांना अश्रू अनावर झाले. अगदी लहानपणापासून कुटुंबियांनी केलेलं सहकार्य, दिलेलं प्रोत्साहन सगळं त्यांच्या डोळ्यासमोरून गेलं.

मालिका क्षेत्रात काम करणं म्हणजे फक्त चांगला अभिनय येणं महत्वाचं नसतं तर आपण वक्तशीर असणं हे जास्त महत्वाचं असतं असं त्यांना वाटतं. अभिनय क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या आणि कैमरा समोर अभिनय करू इच्छिणाऱ्यांसाठी त्यांनी एक मोलाचा सल्ला दिला आहे. त्या म्हणतात, शूटिंग करताना नाटकासारखे प्रेक्षक समोर बसलेले नसतात. पण अभिनय तर आपल्याला जीव ओतूनच करावा लागतो. मग अशावेळी शूटिंग च्या सेट वर जे लाईट्स लावणारे दादा असतात, चहा पाणी देणारे स्पॉट दादा असतात अश्या व्यक्ती आपला सीन पाहून काय बोलतात, कशी दाद देतात यावरून आपण समजावं की आपलं काम टीव्हीवर लोकांना आवडेल की नाही. थोडक्यात शूटिंग करताना आपली टीम हीच आपला पहिला प्रेक्षक असते!

सुरुवातीला मी म्हटल्याप्रमाणे, महत्वाच्या पण अगदी मोजक्या भूमिका नेहाताई स्वीकारतात. पण त्यांच्या कामाची चाहती म्हणून मी त्यांना वारंवार विविध माध्यमांमधून प्रेक्षकांसमोर येत राहण्याची विनंती केली आणि त्यांनी ती नम्रपणे स्वीकारली देखील!

त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा!

**विशेष- वरील शोधनिबंध प्रत्येक अभिनेत्रीची स्वतः फोनवरून घेतलेली मुलाखत आहे**